# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००

जा.क्र.: मका/कार्य/२०१५-१६/9828 दिनांक :- 29-11-2015

परिपत्रक

**विषय :- गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार व कामगार भूषण पुरस्कार – सन २०१५**

उपरोक्त विषयाला अनुसरुन सर्व सहाय्यक कल्याण आयुक्त,कामगार कल्याण अधिकारी व केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की,महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व कर्मचाऱ्यांना साहित्य,सामाजिक,शैक्षणिक,क्रिडा आदी क्षेत्रातील विशेष योगदानासाठी मंडळाकडून गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार दिला जातो तसेच गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार मिळाल्यानंतर पुढील १० वर्षे साहित्य,सामाजिक,शैक्षणिक,क्रिडा आदी क्षेत्रात योगदान देणाऱ्या कामगारांस मंडळाकडून कामगार भूषण पुरस्कार दिला जातो.

सन २०१५ या वर्षीचा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार व कामगार भूषण पुरस्कार प्राप्त करण्यासाठी कामगार व कर्मचाऱ्यांकडून विहीत नमुण्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.सदरच्या पुरस्काराचे अर्ज,माहितीपत्रक,भिंतीपत्रके व कंपणीचा गोपनीय अहवाल इत्यादी स्वतंत्र पत्राने विभाग प्रमुखांना पाठविण्यात येणार आहेत सदरचे अर्ज त्यांनी त्यांच्या स्तरावर गट व केंद्रांना उपलब्ध करुन द्यावेत.अर्ज विक्री दिनांक १ डिसेंबर २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ पर्यन्त करण्यात यावी व अर्ज स्विकृती ही त्याच कालावधीत फक्त मध्यवर्ती कार्यालय,मुंबई येथे करण्यात येणार आहे.

तरी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपरोक्त पुरस्काराची माहिती कामगार कल्याण निधी भरणाऱ्या विविध आस्थापनातील कामगार व कर्मचाऱ्यांना देऊन प्रसिध्दी करावी.

Jadhav

कल्याण आयुक्त

प्रत:

१) सर्व अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.
२) सहाय्यक कल्याण आयुक्त/प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त /सर्व विभागीय कार्यालये/ कामगार क्रिडा भवन,मुंबई
३) कामगार विकास अधिकारी, कामगार कल्याण भवन,नागपूर/पुणे
४) सहाय्यक लेखा अधिकारी सर्व विभागीय कार्यालये
५) कामगार कल्याण अधिकारी,१८ गट कार्यालये. ★★★
६) केंद्र प्रमुख, सर्व केंद्र

★★★ यांनी सदरचे परिपत्रक सर्व केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन दयावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## कामगार भूषण पुरस्कार व
## गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार - २०१५

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी (LWF) भरणा-या कामगार/कर्मचा-यांकडून कामगार भूषण पुरस्कार व गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त करण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जदार कामगाराने पुढील नियम व अटी नुसार अर्ज भरून आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रतीसह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई - ४०० ०१३ यांच्याकडे आपल्या व्यवस्थापनाच्या शिफारशीसह दिनांक **३१ डिसेंबर २०१५** रोजी सायंकाळी ५-३० पूर्वी / पर्यंत पोहचेल असा पाठवावा. यानंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

## नियम व अटी

१. अर्जदार कामगाराने मंडळा मार्फत दिल्या जाणा-या विहित नमुन्यात अर्ज करणे बंधनकारक राहील.

२. अर्जासोबत १ स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर चिकटवावा व एक फोटो स्वतंत्र जोडावा.

३. गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारासाठी कमीत कमी ५ वर्षे सेवा असणे आवश्यक आहे.

४. कामगार भूषण पुरस्कारासाठी मंडळाचा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार मिळाल्यानंतर १० वर्षे सेवा झालेली असावी.

५. अर्ज हा स्वच्छ व परिपुर्ण भरलेला असावा. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

६. अर्जासोबत वेतन पावती / रेशनकार्ड / शैक्षणिक दाखले / कुटुंब नियोजन केल्याचा दाखला इ. आवश्यक असलेली कागदपत्र अर्जात नमुद केल्या प्रमाणे जोडणे आवश्यक आहे.

७. जोडलेली सर्व सत्यप्रती-कागदपत्र ही साक्षांकित केलेली असणे आवश्यक आहेत किंवा स्वयं साक्षांकन प्रति जोडण्यात याव्यात व सत्यतेबाबत स्वयं साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र सोबत जोडावे.

८. व्यवस्थापनेचा गोपनीय अहवाल व्यवस्थापने कडून सीलबंद व गोपनिय लखोट्यात असावा.

९. पोलीस दाखला हा अर्जा सोबत मुळ प्रतीत जोडावा. अथवा मुलाखतीच्या वेळी सादर करावा.

१०. पुरस्कारासाठी कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव किंवा अन्य दबाव आणल्यास सदर व्यक्ती पुरस्कारासाठी अपात्र ठरविली जाईल.

११. अर्जात दिलेली कोणतीही माहिती खोटी असल्यास अथवा मंडळाची दिशाभूल केल्यास दिलेला पुरस्कार परत घेण्याचा अधिकार मंडळास राहील आणि अशा अर्जदारास मंडळाच्या कोणत्याही पुरस्कारा करीता अर्ज करता येणार नाही. त्यांना कायम स्वरूपी अपात्र ठरविले जाईल.

१२. व्यवस्थापनेने दिलेली कामगार अर्जदारा विषयीची माहिती खोटी आढळून आल्यास अशा व्यवस्थापनेने केलेली शिफारस रद्द करून पुढील ३ वर्षा पर्यंत त्या व्यवस्थापनेने केलेली अन्य कामगारा विषयाची शिफारस विचारात घेतली जाणार नाही.

१३. अर्जामध्ये खोटी माहिती, खोटी प्रमाणपत्र देणा-या व्यक्ती, तसेच व्यवस्थापनेने केलेली चुकीची शिफारस इ. बाबी आढळल्यास त्यांच्या विरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.

१४. काही अडचणीमुळे सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या अथवा आर्थिक अडचणीमुळे बंद झालेल्या उद्योगास माहे डिसेंबर २०१५ पर्यंत ३ वर्षे वा त्या पेक्षा कमी कालावधी होत असल्यास अशा व्यवस्थापनेतील कामगाराने केलेला अर्ज ग्राह्य मानला जाईल. मात्र कंपनी बंद होण्यापुर्वीचा कामगार कल्याण निधी (LWF) भरणा केल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.

१५. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अन्वये वेतनातून कामगार कल्याण निधी (LWF) कपात केलेली माहे जून २०१५ ची वेतनाची पावती किंवा आस्थापनाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. ज्या अर्जदाराला पुरस्कार मिळाला नाही, अशा सर्व अर्जदारांचे अर्ज पुरस्काराची यादी जाहीर झाल्यानंतर एका महिन्याने ते त्यांना मागणीनुसार परत केले जातील.

१७. अर्जाची किंमत कामगार भूषण पुरस्कारासाठी रू. २००/- व गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारसाठी रू १००/- अशी राहील.

१८. सन २०१५ करीता कामगार भूषण पुरस्कारासाठी निवड झालेल्या एका कामगारास रोख पारितोषिक म्हणून रू. २५०००/- स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र आणि गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारार्थींना रोख रू. १५०००/- स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सन्मानित केले जाईल.